अल्पसंख्याक बहुल क्षेत्रामध्ये अल्पसंख्याक महिलांसाठी राबविण्यात येत असलेल्या बचत गट योजनेसाठी सन २०१५-१६ करिता अनुदान वितरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय, क्रमांक : मविम- २०१५/प्र.क्र. ११०/का-९
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २८ जानेवारी, २०१६.

संदर्भ:- १) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. अविवि-२००९/प्र.क्र.१४/ का.९, दि. २८ फेब्रुवारी, २०१२.
२) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. अविवि-२००९/प्र.क्र.१४/ का.९, दि. १ मार्च, २०१४.
३) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. मविम-२०१५/प्र.क्र.११०/का.९, दि. ०१ जून, २०१५.
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि १७ एप्रिल, २०१५.
५) शासन परिपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.बीयुडी-२०१४/प्र.क्र.१४८ (भाग- २)/का-७, दि.२१ एप्रिल, २०१५.
६) शासन परिपत्रक, वित्त विभाग, पूरक-२०१५/प्र.क्र.१४०/अर्थसंकल्प-३, दि.६ ऑक्टोबर, २०१५.
७) महाव्यवस्थापक, (वित्त व प्रशा.), महिला आर्थिक विकास महामंडळ यांचे पत्र क्र. माविम/पीएमडी/२०१५/२२३, दि. ०८ जानेवारी, २०१६.

प्रस्तावना:-

राज्यातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात वास्तव्यास असलेल्या अल्पसंख्याक लोकसमूहातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी त्यांना संघटीत करून पुरेसा पतपुरवठा उपलब्ध करून देणे व त्यांना उद्योजकतेविषयक आवश्यक असलेली माहिती देऊन त्यांच्यामध्ये उद्योजकीय कौशल्ये विकसित करण्याच्या हेतून संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयाद्वारे अल्पसंख्याक लोकसमूहातील महिलांचे स्वयंसहाय्यता गट स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या अंतर्गत पहिल्या टप्प्यात मुंबई शहर, मुंबई उपनगर, नांदेड, मालेगांव, कारंजा, परभणी, पुणे, नागपूर, औरंगाबाद, भिवंडी, मुंब्रा-कौसा आणि मिरज येथे अल्पसंख्याक लोक समुहातील महिलांचे स्वयंसहाय्यता बचत गट स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत अल्पसंख्याक महिलांचे २४०० बचत गट निर्माण करून त्यांचे १३ लोकसंचलित साधन केंद्र ८ वर्षाच्या कालावधीत उभी राहणार आहेत. या करीता रु. २७,५४,३२,६३९ /- (अक्षरी रू.सत्तावीस कोटी चोपन्न लक्ष बत्तीस हजार सहाशे एकोणचाळीस फक्त) इतक्या अपेक्षित खर्चास संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. ही योजना महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी सन २०१५-१६ या वर्षात अंमलबजावणीसाठी रू. २.०० कोटी एवढा नियतव्यय उपलब्ध आहे. त्यापैकी रू.१.४० कोटी

अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. सदर अर्थसंकल्पित नियतव्ययाच्या ७० टक्के मर्यादेपर्यंत रू.९८,००,०००/-(अक्षरी रू. अठ्ठ्यान्नव लक्ष फक्त) एवढा निधी वितरित करण्यास संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान केली आहे. तसेच या योजनेसाठी शिल्लक असलेला रु. ६०,००,०००/- (अक्षरी रू. साठ लक्ष फक्त) नियतव्यय सन २०१५ चे पावसाळी अधिवेशनामध्ये अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. या योगे रू. २.०० कोटीचा पूर्ण नियतव्यय उपलब्ध आहे. सदर अर्थसंकल्पित नियतव्ययाच्या ७० टक्के मर्यादेपर्यंत निधी वितरीत करण्यास वित्त विभाग संदर्भ क्र. ६ येथिल शासन परिपत्रकान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यामुळे त्यामधील रू. ४२,००,०००/- (अक्षरी रू. बेचाळीस लक्ष फक्त) एवढा निधी व रू. ६०,००,०००/- (अक्षरी रू साठ लक्ष फक्त) निधी मिळून रू १,०२,००,०००/- (अक्षरी रू. एक कोटी दोन लक्ष फक्त) इतका निधी वितरणासाठी उपलब्ध आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाने त्यांच्या संदर्भ क्र. ७ येथिल दि. ०८ जानेवारी, २०१६ रोजीच्या पत्रान्वये निधी मिळण्याबाबत मागणी केली आहे. त्यानुसार निधी वितरणाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

त्यानुसार या योजनेसाठी या आर्थिक वर्षात व्दितिय पुरवणी मागणीव्दारे उपलब्ध रू. ६० लक्ष (अक्षरी रू. साठ लक्ष फक्त) निधीच्या ७० टक्के मर्यादेत रू. ४२,००,०००/- (अक्षरी रू. बेचाळीस लक्ष फक्त) एवढा निधी महिला आर्थिक विकास महामंडळाला वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर रकमेचा Electronic Clearing Service (ECS) अवर सचिव (१), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या नावे काढण्यात यावा.

३. या रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र महिला आर्थिक विकास महामंडळाने शासनास सादर करणे आवश्यक राहील. प्रस्तुत प्रकरणी सदर रक्कम आहरीत करण्यासाठी अवर सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग नियंत्रण अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी राहतील.

४. यासाठी होणारा खर्च सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरीता मागणी क्र. झेडई-१, २२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २०० इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) अल्पसंख्याकांना सहाय्य (०१) (१०) स्वयंसहाय्य गटाकरीता सहायक अनुदान (२२३५ ए १६९), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली मंजूर असलेल्या अनुदानातून खर्ची टाकण्यात यावा.

५. महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत याबाबतचे वर्षनिहाय खर्चाचा लेखाविषयक तपशिल ठेवावा, ज्या बाबींसाठी अनुदान वितरीत करण्यात आले आहे त्याबाबींवरच खर्च करण्यात यावे. सदर बाबींचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करणे बंधनकारक राहील. अल्पसंख्याक विकास विभागाचे अधिकारी स्वयंसहायता बचत गटास भेट देतील.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७/०४/१५ च्या शासन परिपत्रकासोबत जोडलेल्या परिशिष्टांमधील अटी तसेच सदर शासन परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ येथील सर्व अटींची पूर्तता होत असल्याने तसेच वित्त विभाग शासन परिपत्रक दि.०६/१०/२०१५ अन्वये प्राप्त मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२८१७१५०३३६१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok Hari Gaikwad

Digitally signed by Ashok Hari Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=MINORITY DEVELOPMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9bcd09896471a6f90b80581ca42d45e27f07ad7e99a45bec3a7579cf10330fcd, cn=Ashok Hari Gaikwad
Date: 2016.01.28 17:16:37 +05'30'

(अशोक गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा.राज्यपालांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) मा.मंत्री/ राज्यमंत्री (अ.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
५) प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
६) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
७) महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,
८) संचालक, लेखा व कोषागारे
९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१०) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) सर्व जिल्हाधिकारी,
१३) महिला आर्थिक विकास महामंडळ, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा (पूर्व) मुंबई,
१४) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१५) सर्व मंत्रालयीन विभाग
१६) उप सचिव, वित्त विभाग (व्यय-४), अर्थ-१४ नियोजन विभाग (का-१४७५) मंत्रालय, मुंबई,
१७) अवर सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग/ अर्थसंकल्प शाखा, मंत्रालय, मुंबई,
१८) निवडनस्ती (कार्यासन-९)